कोविड संशयित मृत व्यक्तीचे Inquest न करण्याची मुभा देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०४२०/प्र.क्र.५२/विशा १ अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०७ एप्रिल, २०२०.

संदर्भ :- १) फौजदारी दंड संहिता, १९७३ मधील कलम १७४.
२) साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ (Epidemic Diseases Act, १८९७)

प्रस्तावना :-

सध्याच्या करोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या कोविड संशयित मृत व्यक्तीची पोलीस यंत्रणेमार्फत मृत्यूच्या Inquest चा आग्रह धरण्यात येत आहे. सध्या असलेल्या परिस्थितीत मृत व्यक्तीच्या Inquest करण्यामध्ये डॉक्टर्स, नर्स, पोलीस यांना करोना संसर्ग जास्त प्रमाणात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा मृत व्यक्तीचे Inquest न करण्याची मुभा पोलीस यंत्रणेला देण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक :-

रुग्णालयात आणलेल्या कोविड संशयित मृत व्यक्ती संदर्भात तत्कालिन परिस्थितीच्या आधारे वैद्यकिय अधिकाऱ्याचे मत घेऊन मृत व्यक्तीचे Inquest न करण्याची मुभा पोलीस यंत्रणेला देण्यात येत आहे.

सदरचे आदेश हे साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ (Epidemic Diseases Act, १८९७) मधील भाग २ सह आपत्तीव्यवस्थापन कायदा, २००५ (Disaster Management Act, २००५) मधील तरतुदी अन्वये राज्यामध्ये निर्बंध अस्तित्वात असे पर्यंत लागु राहतील.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००४०८१३४६४०९८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shirish Nagorao Mohod

Digitally signed by Shirish Nagorao Mohod
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66fda7e745bb4928b21046cecbf7bd8f40e4950e0a99497fa2862e1d37ed75b7, serialNumber=beb4df218cab93811ed9522b6f8ac2546899b499eb80512bfa5ec939466fb620, cn=Shirish Nagorao Mohod
Date: 2020.04.08 16:14:21 +05'30'

(शिरीष मोहोड)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

४) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
७) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
८) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
११) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,
१२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
१४) सर्व पोलीस आयुक्त (पोलीस आयुक्त बृहन्मुंबई वगळून)
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१६) सर्व विभागीय आयुक्त
१७) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
१८) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१९) निवड फाईल (विशा-१ अ).